साप्ताहिक

# परळी परिसर


Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# गॅस टंचाईने परळीकर हैराण; प्रशासनाचे दूर्लक्ष

**परळी वैजनाथ (लक्ष्मण वाकडे):- सणासुदीच्या काळात स्वयंपाकाच्या गॅसचे सिलेंडर मिळत नसल्याने परळीकर मोठे हैराण झाले असून गॅस सिलेंडर साठी नागरिकांना भल्या पहाटेपासून रांगेत थांबावे लागत आहे. शहरात निर्माण झालेल्या गॅस टंचाईकडे प्रशासनासह पुढाऱ्यांचेही दूर्लक्ष असल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.**



सुमारे दीड लाख लोकसंख्येच्या परळी शहरात विविध इंधन कंपन्यांच्या गॅसचे तीन वितरक आहे. असे असले तरी मोठा भार परळी शहरातील वैद्यनाथ गॅस एजन्सीकडे आहे. सुमारे ५० हजार गॅस ग्राहक शहर व परिसरात मिळून आहेत. यात व्यापारी वापराचे ग्राहक वेगळे आहेत. दररोज परळीसाठी सुमारे १००० गॅसच्या टाक्या येथे लागतात. परंतु गेल्या पंधरा-वीस दिवसापासून शहरासाठी पुरेशा गॅस टाक्यांचा पुरवठा होत नसल्याने शहरात गॅसची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. सध्या गॅस कंपन्याकडून केवळ पाचशेच गॅस टाक्यांचा पुरवठा शहरासाठी होतो आहे. हा पुरवठा रोज होत नाही. कधी कधी दोन-दोन दिवस गॅस पुरवठा होत नसल्याने गॅस टंचाईचा प्रश्न परळी शहरात गंभीर झाला आहे. गॅस घेऊन येणाऱ्या गाड्या पहाटे गॅस एजन्सीच्या गॅस गोडाऊनला येतात त्यामुळे गॅस मिळवण्यासाठी अनेक ग्राहक भल्या पहाटेपासूनच गॅस एजन्सीच्या गोडाऊन वर गॅस घेण्यासाठी गर्दी करत आहेत. सकाळी आठ ते नऊ वाजेपर्यंत ५०० टाक्याचे वितरणही होत आहे. यामुळे गॅस एजन्सीच्या दुकानापुढे ताटकळत उभे राहिलेल्या अनेकांना गॅसही मिळत नाही. अनेक तास थांबूनही नागरिकांना रिकामा गॅस घेवून परतावे लागत आहे. गॅस मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची परळी शहरात सध्या मोठी गैरसोय होत आहे. यामुळे परळीकर संतप्त झाले आहेत.

राज्यात होत असलेला मुसळधार पाऊस व बंद पडलेले मार्ग याचा गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. गॅस पुरवठा होण्यास इतरही कारणे आहेत. यामुळे गॅस टंचाई येथे निर्माण झाली आहे. ऐन सणासुदीत गॅस मिळत नसल्याने परळीकरांची सध्या मोठी गैरसोय सुरू आहे. सर्वसामान्यांच्या या प्रश्नाकडे प्रशासनासह पुढाऱ्यांचेही दूर्लक्ष आहे. परळीत गॅसचा पुरेसा पुरवठा व्हावा म्हणून कोणीही प्रयत्न करताना दिसत नाही. यामुळे नागरिक अधिकच संतप्त झाले आहेत. दरम्यान काळ्या बाजारात परळीत अव्वाची सव्वा दराने गॅस टाकीची विक्री होताना दिसते आहे. एकेका गॅस टाकी मागे ५०० ते ७०० रुपये जादा घेतले जात आहेत. नागरिकांच्या गैरसोयीचा फायदा काहीजण घेत आहेत. यामुळे गॅस टाक्यांचा साठा करणाऱ्यांची शहरात सध्या मोठी चांदी आहे. काळ्या बाजारात बेभाव विकल्या जाणाऱ्या गॅस टाक्यांमुळे सर्वसामान्यांची अक्षरशः येथे लूट सुरू असून याकडेही कुणाचेच लक्ष नाही. याप्रकरणी अद्यापही कुणावरच कारवाई झालेली दिसत नाही. परळी शहरात गेल्या पंधरा-वीस दिवसापासून निर्माण झालेल्या गॅस टंचाईच्या प्रश्नाकडे संबंधितांनी लक्ष घालावे व हा प्रश्न सोडवावा अशी मागणी येथे सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, घरगुती गॅसचा वापर सर्रासपणे व्यापारी आस्थापनावर होताना दिसतो आहे. हॉटेल, उपहारगृहे, ढाबे, चहाच्या टपऱ्या आदी ठिकाणी घरगुती गॅस वापरला जातो आहे. या हॉटेल चालकांना घरगुती गॅसचे सिलेंडर मिळते कसे हा प्रश्न आहे. ***



# सावरकर नागरी सहकारी पतसंस्था सभासदांना १० टक्के लाभांश देणार-बाजीराव धर्माधिकारी

परळी वैजनाथ (बातमीदार):- शहरातील बँकींग क्षेत्रात ग्राहक सेवेत तत्पर व बँकीग व्यवहारात विश्वासार्ह पतसंस्था म्हणुन असलेली ओळख कायम ठेवत पतसंस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे.स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेचीवार्षिक सर्वसाधारणसभा खेळीमेळीत पार पडली. यावेळी सभासदांना १०टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

संस्थेच्या कार्यालयात अध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारणसभा झाली. या वेळी आहवाल व ताळेबंद सभेत सादर करण्यात आला. संस्थेची अर्थिकस्थिती पाहता संस्थेने उत्कृष्ट



ताळेबंद निर्माण केला आहे. विशेष म्हणजे अल्पावधीतच पतसंस्थेतील ठेवी- ३९ कोटी ५३ लाख , राखीव निधी -७ कोटी ४७ लाख, भागभांडवल- ६७ लाख ४१ हजार , कर्ज- ३६ कोटी ६ लाख,गुंतवणूक १२ कोटी ५१ लाख, निव्वळ नफा ७८ लाख ६६ हजार, इतका आहे.तर संस्थेची सभासद संख्या -१८९९ आहे. पतसंस्थेच्या या प्रगतीशील वाटचालीत सर्व खातेदार, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा विश्वास हेच पाठबळ आहे असे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. या सर्वसाधारण सभेला पतसंस्थेचे उपाध्यक्ष अनिल आष्टेकर, सचिव जितेंद्र नव्हाडे , कोषाध्यक्ष रवि वळसे, संचालक श्रीकांत मांडे, राजाभाऊ मराठे, रवि मुळे, दशरथ होळकर, डॉ.सौ.श्रध्दा देशपांडे, सौ.पद्मश्री धर्माधिकारी, संस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी यांच्यासह सभासद प्रविण तोथाडे, संगिता डांगे ,सर्व कर्मचारी वृंद, नित्यसंचय ठेव प्रतिनीधी यांच्या सहसभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा शिक्षक संघ शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा;

## मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट एकरी पन्नास हजार रूपये मदत देण्याची केली मागणी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठवाड्यात अतिवृष्टीने कहर केला आहे. शेतात जिकडेतिकडे पाणीच पाणी झाल्याने शेतातील सर्व पिके हातची गेली आहेत. त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट एकरी पन्नास हजार रूपये मदत द्यावी असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी शासनास केले आहे. राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, शेतकऱ्यांची सोयाबीन, उडीद, मुग, बाजरी आदी पिके काढणीस आलेली आहेत. कापसाची बोंडे फुटायची वेळ झालेली आहे, मात्र मराठवाड्यास अभूतपूर्व पावसाने झोडपून काढले आहे. नद्या नाल्यांनी आपली पात्रे सोडून देत शेतालाच नद्यांचे स्वरूप आले आहे. शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.सोयाबीन, उडीद, मुगाचे शेण झाले आहे, कापसाची बोंडे सडली आहेत, कांद्याची लागवड वाया गेली आहे. गावचे गावे पाण्यात आहेत.लोकांच्या घरात पाणी घुसून संसाराची नासधूस झाली आहे.निसर्गाने अवकृपा केल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या मदतीस ताबडतोब धावून येणे गरजेचे आहे. पंचनामे, पहाणी यात कालापव्यय न करता राज्याचे मुख्यमंत्री, अर्थमंत्री व कृषीमंत्री यांनी मराठवाड्यात ताबडतोब ओला दुष्काळ जाहीर करावा आणि एकरी पन्नास हजार रूपयांची मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम व केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव,अशोक मस्कले यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. **



गेल्या कांही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे परळी परिसरातील चांदापूर येथील घनसी नदीवर असलेला तलाव ओसंडून वाहतो आहे. -छाया : भाले डिजीटल, परळी वै.

# संत महंत व मान्यवरांच्या उपस्थितीत 'बाजीराव पेट्रोलियम' चा आज होणार शुभारंभ

Bharat Petroleum

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहराच्या सेवा क्षेत्राच्या वैभवात भर घालणारा अत्याधुनिक असा ''बाजीराव पेट्रोलियम'' या नवीन पेट्रोल पंपाचे शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३१ वाजता संत,महंत व मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली आहे.

ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिर पासून काही अंतरावरच परळी ते नंदगौळ पुस-बर्दापूर रोडवर, श्रद्धानंद गुरुकुल आश्रमासमोर उभारण्यात आलेल्या बाजीराव पेट्रोलियम या भारत पेट्रोलियमच्या अत्याधुनिक पंपावर २४ तास इंधन सेवा उपलब्ध राहणार असून ग्राहकांसाठी सर्व आधुनिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत. या पेट्रोल पंपाचा शुभारंभ राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते होणार आहे. उद्घाटन प्रसंगी शांतिब्रह्म गुरुवर्य ह.भ.प.प. पू.महादेव महाराज चाकरवाडीकर, धर्मगुरू प.पू.अमृताश्रम स्वामी आणि १०८ नंदीकेश्वर शिवाचार्य स्वामी महाराज यांचे आशीर्वाद व आध्यात्मिक सान्निध्य लाभणार आहे. तसेच भारत पेट्रोलियम कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी अहिल्यानगर विभागाचे टेरिटरी मॅनेजर मनोज जगताप, बीडचे वरिष्ठ व्यवस्थापक नीलेश नरखेडे, सहाय्यक व्यवस्थापक अभिषेक कुमार, टेरिटरी को-ऑर्डिनेटर कीर्ती सिंघानी आणि सोलापूरचे वरिष्ठ व्यवस्थापक सचिन रावत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या नव्या सेवा व्यवसायाच्या शुभारंभ सोहळ्याला परळी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन''बाजीराव पेट्रोलियम''चे प्रोप्रायटर, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, हरिहर धर्माधिकारी, ॲड. प्रताप धर्माधिकारी आणि परिवाराने केले आहे. ***

# प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते ७ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे होणार उद्घाटन

## संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक अजयकुमार गंडले यांची निवड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या ७ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे.तर संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत अजयकुमार गंडले यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती मुख्य संयोजक रानबा गायकवाड व स्वागत समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

परळी वैजनाथ येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षण मार्गच्या वतीने एकदिवसीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार आहे. संमेलनात परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलन आदी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. तर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे. प्रभाकर साळेगावकर यांचे वादळ (कविता संग्रह) हळवे ठसे( हायकूसंग्रह) तूच आमची शान (बालकविता संग्रह) आंघोळीचे झाड (बालकथा संग्रह) तसेच पाणी बाणी हा संपादित कवितांचा संग्रह प्रकाशित झालेला आहे.

कवी ,विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांना त्यांच्या साहित्य लेखनाबद्दल आचार्य अत्रे आद्य



विडंबनकार राज्यस्तरीय पुरस्कार, यशवंत साहित्य गौरव पुरस्कार, उत्कृष्ट वांडमय निर्मिती पुरस्कार नागोठाने जिल्हा सांगली, लोकसंवाद पुरस्कार उंमरी ,जिल्हा नांदेड, सुबदा प्रतिष्ठान ,सेलू यांचा वांडमय पुरस्कार, स्वर्गीय प्रमोद महाजन साहित्य पुरस्कार, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार आदी पुरस्काराने आतापर्यंत सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील विद्यापीठाच्या प्रथम वर्ष मराठी पुस्तकात हायकूचा समावेश करण्यात आलेला आहे. एशियन पोएट्रीमध्ये मराठीतील कवी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात तसेच गोवा राज्यातील अनेक साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून यांची उपस्थिती लाभलेली आहे.

संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले अजयकुमार गंडले हे परभणी येथील भदंत उपाली हायस्कूल येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक आहेत. व्याख्याते, विचारवंत म्हणून त्यांची सर्वदूर ख्याती आहे.त्यांचा नवराष्ट्र निर्माते: डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. तर विश्व मानवतावादाचे आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा ग्रंथ लवकरच प्रकाशित होणार आहे. अजयकुमार गंडले यांचे धर्मयुद्धातील वणवा, साक्षरता काळाची गरज, व्यसनाधीनता व आजचा युवक, अंधारातून प्रकाशाकडे, डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रप्रेम, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच महिलांचा सन्मान, भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वोच्च योगदान,तसेच दैनिक सम्राटचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तरी जयंती महोत्सव निमित्ताने युनोमध्ये प्रकाशित झालेल्या महा विशेषंकामध्ये लेख प्रकाशित झालेला आहे. याबरोबरच शेतकरी, कामगार, महिला, उपेक्षित, सामाजिक, शैक्षणिक विषयांवर त्यांनी लेखन केले आहे.साहित्यिक अजयकुमार गंडले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य पुरस्कार नागपूर येथील भारतीय बहुजन समाज पुरस्कार अमरावती तसेच महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कारांसह गौरविण्यात आलेले आहे. ***

### खरय.. पण...



**नाशिकला दोन वर्षांनी होणाऱ्या कुंभमेळ्याला १४ हजार कोटी तर सध्या अतिवृष्टीमुळे उध्दवस्त झालेल्या राज्यभरातील शेतकऱ्यांना फक्त २२१५ कोटी?**

### हसरा कोपरा..!



**तुझी बायको तुला प्रेमाने 'रिटायर्ड' म्हणून का हाक मारते रे?**

**कारण माझं नाव 'निवृत्ती' आहे.**

**संपादकीय...**

# महासंकट...

**✻ सुविचार ✻**

**जिथे रूजत नाही तिथे बी पेरू नये, जिथे मोल जाणले जात नाही तिथे शब्द टाकू नये. स्वाभिमान असावा पण गर्व नसावा आत्मविश्वास असावा पण अहंकार नसावा.**

मागच्या अनेक दशकात झाला नाही असा विचित्र पावसाळा यंदा आपण सारे जण अनुभवतो आहोत. गेल्या मे महिन्यापासून सुरू झालेला यंदाचा पावसाळा सप्टेंबर सरत आला तरी थांबायचे नाव घेत नाही. गेल्या पाच महिन्यापासून आपल्याकडे पावसाळा सुरू आहे. गेल्या १५ ऑगस्ट नंतर तर आपल्याकडे सक्रिय झालेला पाऊस विचित्रच बरसतो आहे. आजपर्यंत पावसाबाबत झडीचा, रिमझिम, हलका, मध्यम, जोरदार, मुसळधार पाऊस असे शब्दप्रयोग पावसाबाबत आपण करत होतो. परंतु यंदाच्या पावसाळ्यात हे सर्व शब्द मागे पडून अतिवृष्टी, ढगफुटी असे नवे शब्द पडणाऱ्या पावसाबाबत रूढ झाले आहेत. तीन-तीन, चार-चार दिवस सलग पडणाऱ्या झडीच्या पावसाचा तर यंदा पत्ताच नाही. उत्तर भारतात ढगफुटीचा पाऊस व्हायचा असे आपण चित्र पाहत होतो. बातम्यांमध्ये ऐकत होतो. परंतु आता आपल्या घाटमाथ्यावर असलेल्या मराठवाड्याच्या पठारावर असा पाऊस बरसतो आहे. अशा बदललेल्या पावसाची आता मात्र सर्वांना मोठी चिंता लागली आहे.

गेल्या मे महिन्यातल्या पावसामुळे तयार झालेले अनुकूल हवामान व नंतरच्या काळात पडत गेलेल्या पावसावर यंदा खरिपाच्या पेरण्या झाल्या. पेरण्यानंतर पावसाचा मोठा खंड पडला. यंदा दुष्काळ पडतो की काय, अशी भीती वाटत होती. परंतु अधून मधून पडत केलेल्या पावसाच्या हलक्या सरीवर खरिपाची पिके तग धरून राहिली. या पावसावरच ती तारारली. त्यातच मे महिन्यातील पावसाचा जमिनीत जलसाठा असल्याने सिंचनावरही शेतकऱ्यांनी पिके जगवली. यामुळे यंदा खरिपाची पिके चांगली बहरली होती. ऑगस्टमध्ये सक्रिय झालेल्या पावसाने ही पिके जोमाने वाढली. यामुळे यंदा खरिपाची पिके चांगली येणार ही अशा सर्वांना वाटू लागली. परंतु गेल्या दहा-बारा दिवसापासून बरसणाऱ्या धो-धो पावसाने मराठवाड्यातील ५० टक्क्यावर शेत जमिनीतील पिकांचा चिखल झाला आहे. नुसता चिखल झाला नाही तर पुराच्या पाण्यात अनेक ठिकाणी शेतजमिनीतील मातीसह पिके वाहून गेली आहेत. महसूल विभागाने गेल्या काही दिवसात केलेल्या पंचनाम्यानुसार दिलेल्या प्राथमिक अंदाजात मराठवाड्यात पेरणी झालेल्या ४८ लाख हेक्टर पैकी २४ लाख हेक्टर वरील खरिपाची पिके उध्वस्त झाली आहेत. यातील मोठ्या प्रमाणात खरीप पिकाचा चिखल झाला आहे तर बहुसंख्य शेतजमिनीत पाणी साचल्याने या जमिनींना शेततळ्याचे स्वरूप आले आहे. याचा मोठा फटका यंदा शेती उत्पादनाला बसणार आहे. यामुळे आपल्याकडील शेतकरी महा संकटात अडकला आहे. शेतात पाणी असल्याने रब्बीच्या पूर्व मशागतीची कामे करायची कधी व पेरणी करावी कधी, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांपुढे आहे. लाखो हेक्टर शेत जमिनीतील पिके गेल्याने त्याचा शेती उत्पादनावर परिणाम होऊन सर्वसामान्यांनाही मोठ्या महागाईला तोंड द्यावे लागणार आहे. या व अशा संकटाने शेतकऱ्यांचा धीर सुटत चालला आहे. शेतकऱ्यांची स्वप्ने भंग होत आहेत. त्यांची जगण्याची अशाच यामुळे कमी होत चालली आहे. यातूनच गेल्या काही दिवसात काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना मराठवाड्यात घडल्या आहेत. शेतकऱ्यांना या परिस्थितीत आधार देण्यासाठी राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, सरकारमधील मंत्री, आमदार, खासदार तसेच इतर लोकप्रतिनिधी शेत जमिनीवरचा चिखल तुडवीत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांना आधार देत आहेत. सरकारचे मंत्री, आमदार, खासदार शेतकऱ्यांना सरकारकडून मदतीचे आश्वासन देत आहेत. या संकटात सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे असे, सांगत आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहाची भेट घेऊन या नैसर्गिक संकटाची माहिती त्यांना देऊन, केंद्राकडून भरघोस मदतीची मागणी त्यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.२६) दिल्लीला जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रत्यक्ष भेट घेतली आहे. महाराष्ट्रातील या नैसर्गिक महासंकटाची माहिती त्यांनी पंतप्रधानांना देऊन शेतकऱ्यांना कर्जमाफी व मोठ्या मदतीची मागणी त्यांच्याकडे श्री फडणवीस यांनी केली आहे. सरकारकडून मदत मिळेल ही परंतु अशा संकटामुळे शेतकरी खचत चालला आहे त्याचे काय, शेती उध्वस्त होत आहे. त्याचे काय, यातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी व्यापक आधाराची व प्रयत्नाची गरज आहे व असे प्रयत्न होणे गरजेचे आहे. असा विचित्र पाऊस यांदा मराठवाड्याच्या पठारावर का बरसतो आहे. याच्या कारणाचा शोध घेऊन व्यापक उपायोजना ही हाती घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे. बदलत चाललेले ऋतुचक्र, जागतिक तापमान वाढ यास जबाबदार असल्याचे काही तज्ञ सांगतात. तर काही वाढते प्रदूषण, घटत चाललेली वनराई यास जबाबदार आहे, असे काहींचे मत आहे. तर हा पाऊस कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पडतो आहे, असे काहींचे मत आहे. मराठवाड्यात पडत असलेले ढगफुटीचे पाऊस कशामुळे बरसत आहेत. याची खरे कारणे अद्यापही कोणी स्पष्टपणे सांगत नाही. यामुळे बदलते हवामान, विचित्र बरसणारा पाऊस याची सगळ्यांनाच चिंता लागली आहे. याबद्दल त्या हवामानाबाबत हवामान अभ्यासकांनी शास्त्रज्ञांनी व्यापक संशोधन करणे गरजेचे आहे. यातून ठोस उपाययोजना करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. अशा निर्माण होत असलेल्या संकटावर वेळीच उपायोजना न केल्यास आपल्याकडील शेती व शेतकरी उध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही. ✻✻✻

# हा शेवट नाही, ही सुरुवात आहे..!

**अतिवृष्टीने सर्वकाही वाहून नेले, पाऊस मात्र अजूनही थांबण्याचे नाव घेत नाही. सगळीकडे पाऊसच पाऊस अन् पाणीच पाणी आहे. यंदाच्या अतिवृष्टीने आलेल्या महापुरात शेतकऱ्यांचे अश्रूही वाहून गेले. त्यांना वाट करून देता यावी एवढेही काही उरले नाही. पाण्याच्या सुकाळात 'अश्रुंचा' पडलेला दुष्काळ येथील भयानक वास्तव दर्शवतो. नेणारा नेईल, नेत राहिल...तो निसर्गायं...काय द्यायचे अन् काय न्यायचे हे तोच ठरवतो. मात्र देणारे आपण आहोत, काय द्यायचे ते आपण ठरवायचे.**



आपल्यापैकी प्रत्येकच जण शाळेत गेलेला आहे. शाळेतील परिपाठात आपण प्रार्थना म्हणायचो 'भारत माझा देश आहे.' या प्रार्थनेत 'भारत आपला देश आहे..' असेही लिहिता आले असते. मात्र आपला म्हटल्यावर तो सर्वांचा झाल्याने इतरांकडून अपेक्षा ठेवण्याची भावना वाढते, म्हणूनच भारत हा जेंव्हा 'माझा' देश आहे असे आपण म्हणू तेंव्हा त्यात माझेपणाची, स्वत्वाची, आपुलकीची भावना असल्याने माणूस जबाबदार बनतो आणि तसे वागतो. त्यापुढे जाऊन 'सारे भारतीय माझे बांधव आहेत..' अस म्हटल्यानंतर तर सर्वांच्या मनात गर्व आल्याने छाती फुगून येते आणि माणुसकीची भावना तिथे वृद्धिंगत होते. माणुसकीची भावना जपणारा आणि जोपासणारा पृथ्वीवरील भूभाग म्हणजे भारत.. त्यातल्या त्यात महाराष्ट्र आणि अजूनच माणुसकी हवी असेल तर तो 'मराठवाडा'.

आज हाच आपल्या देशाचा भूभाग संकटात आहे, येथीलच माणसे आज मृत्यूच्या दाढेत आहेत. निसर्गाच्या प्रलयंकारी स्वभावाने त्यांना गच्च मगरमिठी मारलीये... हे माणसाला आणि माणुसकीला थेट आव्हान असल्याप्रमाणेच आहे हे समजून घ्यावे लागेल. त्यासाठी माणसाने सर्वकाही विसरून एकमेकांसाठी धाऊन जाण्याची वृत्ती ठेवावी हा त्या निसर्गाचा कदाचित संदेश आहे. ना जात, ना धर्म, ना पक्ष, ना विचार...इथे वेळ आहे हातात हात घेण्याची, इथे वेळ आहे हातात हात देण्याची.

**देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे-** ही कविता सर्वांनी वाचली, वाचून सोडून दिली मात्र कोणाकडून काय घ्यावे हे त्या संपूर्ण कवितेतील पुढील ओळीत लिहिलेले आहे.

*''हिरव्या पिवळ्या माळावरुनी*
*सह्याद्रीच्या कड्यावरुनी*
*छातीसाठी ढाल घ्यावी*
*वेड्यापिशा ढगाकडून*
*वेडेपिसे आकार घ्यावे*
*रक्तामधल्या प्रश्नासाठी*
*पृथ्वीकडून होकार घ्यावे*
*उसळलेल्या दऱ्याकडून*
*पिसाळलेली आयाळ घ्यावी*
*भरलेल्या भिमेकडून*
*तुकोबाची माळ घ्यावी*
*देणार्याने देत जावे*
*घेणार्याने घेत जावे*
*घेता घेता एक दिवस*
*देणार्याचे हात घ्यावे.''*

म्हणजे सर्वकाही देणारा दाता म्हणून ज्या निसर्गाकडून आपण सर्वकाही घेतले त्याला काहीतरी देणे आपल्याकडून अपेक्षित असल्याचे 'आपत्ती' हे लक्षण असते. परंतु, मी म्हणतो..!

*होईल ते होईल, जाईल ते जाईल*
*निसर्गाने दिले आहे, त्याला न्यायचे ते नेईल*
*आपण घेत राहणार, तो नेत राहणार*
*तो पुन्हा देईल, तो पुन्हा नेईल*
*घेणाऱ्याने त्याचा राग घ्यावा,*
*घेणाऱ्याने त्याची भावना घ्यावी*
*त्याचे काय म्हणणे आहे?*
*एकदा त्याची पुढील कल्पना समजून घ्यावी!*

हा शेवट नाही, ही सुरुवात आहे...ज्याने दिले तोच नेणार आहे...त्याचा भाव, स्वभाव आणि त्याचा विचार समजून घेतला तरच त्याच्या डोक्यात पुढे काय आहे हे तुम्हाला सांगेल? अन्यथा त्याचे रूप, स्वरूप आणि रौद्ररूप ते येणाऱ्या काळात दाखवेल? समजा समजून घ्या आणि 'माणूस म्हणून एकमेकांना हाती हात द्या.'

**- दत्तात्रय काळे,**
पत्रकार, परळी वैजनाथ.

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
✻ वर्ष ०९ ✻ अंक २१ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) शनिवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ ✻ किंमत : २ रू.

# अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचा अहवाल तातडीने सादर करा - तहसीलदार व्यंकटेश मुंडे



परळी वैजनाथ (बातमीदार):- अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचा तातडीने अहवाल सादर करावा, अशा कडक सूचना सर्व संबंधिताना तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी आज दिल्या. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपत्ती आढावा बैठक आज संपन्न झाली.

गेल्या काही दिवसापासून परळी तालुका आणि परिसरामध्ये अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे महापूर आला. यामुळे गावोगावी मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आज शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत सर्व तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांची अतिवृष्टी व पूर पंचनामे व मदत या अनुषंगाने सविस्तर आढावा बैठक तहसील कार्यालयात घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर होते. यावेळी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सद्यपरिस्थितीचा आढावा घेतला. ऑगस्ट अनुदान याद्या, खरडुन गेलेल्या जमिनीचे अहवाल, बाधित कुटुंबांना मदत करणे, मयत जनावरांचे पीएम, घर पडझड व विहीर नुकसानी याबाबत सविस्तर सूचना देऊन सूचना केल्या.

अतिवृष्टी आणि पूर परिस्थिती याबाबत शासन अतिशय गंभीर आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपापले काम चोख आणि तातडीने करणे गरजेचे असल्याचे सांगून या कामात कोणतीही हयगय किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही असा इशारा तहसीलदार मुंडे यांनी दिला. तालुक्यात अनेक कुटुंबे बाधित झाली असून कोणीही मदतीपासून वंचित राहणार नाही याची सर्वांनी खबरदारी घ्यावी अशा सूचना करून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून अहवाल प्रशासनाकडे सादर करावा अशा सूचना देऊन अतिवृष्टी आणि पूर परिस्थिती बाबतच्या कामकाजामध्ये कोणी हाय गयी केली तर त्यावर कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही यावेळी उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर व तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी दिला. बैठकीला तालुका कृषी अधिकारी रवि मुंडे, नायब तहसीलदार पंडित सुरवसे, वाकडे, मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहायक व ग्रामसेवक यांची उपस्थिती होती. **

# शिक्षक साहित्य संमेलन स्मरणिकेसाठी शिक्षकांनी साहित्य पाठविण्याचे आवाहन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी येथे ७ वे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार असून या निमित्ताने प्रकाशित करण्यात येत असलेल्या स्मरणिकेसाठी शिक्षकांनी आपले साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मराठवाडा पातळीवरील या साहित्य संमेलनात विविध कार्यक्रमांनी रेलचेल असणार आहे.तसेच गुणवंत शिक्षकांना शिक्षक गौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. या एकदिवसीय संमेलनाच्या निमित्ताने स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षक, शिक्षीका प्राध्यापक यांनी कथा, कविता, लेख, शाळां-महाविद्यालयातील विशेष उपक्रम याविषयी माहिती पाठवू शकता.

आपले साहित्य डीटीपी करून अथवा पीडीएफ स्वरुपात, पासपोर्ट फोटो सह ९४२०१४८५३८ या व्हाट्सअप क्रमांकावर तसेच ranbagaikwad press1@gmail.com या मेलवर १ ऑक्टोबर पर्यंत पाठविण्याचे आवाहन संयोजक रानबा गायकवाड व स्वागत समितीच्या वतीने करण्यात आले आहे.*

# शारदा विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा आधार घेत केले प्रयोग सादर



परळी वैजनाथ, (बातमीदार):- नाथ शिक्षण संस्था संचलित शारदा विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा आधार घेऊन, विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग सादर केले.

विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण करण्यासाठी नाथ शिक्षण संस्था संचलित शारदा विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या वतीने विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग सादर करण्या करिता शाळेचे विज्ञान विभाग प्रमुख एस.बी.राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञानाचा आधार घेऊन वेगवेगळे प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पवनचक्की, विद्युत घंटा, सौर ऊर्जेचे प्लांट या सारखे वेगवेगळे प्रयोग सादर करत आपण सुद्धा जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी सक्षम आहोत असे दाखवून दिले.शारदा विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

***

# जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत वरद लांडगे प्रथम; न्यू हायस्कूल शाळेत सत्कार



परळी वैजनाथ (बातमीदार):- येथील न्यू हायस्कूल शाळेचा कर्तृत्ववान विद्यार्थी चि. वरद श्रीराम लांडगे (वर्ग ८ वी) याने आपल्या उत्तुंग कामगिरीने शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करत जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर प्रकारात वरदने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला असून आता तो होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे

याबाबत माहिती अशी की; शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत ब्रेस्ट स्ट्रोक ५० मीटर प्रकारात वरदने अविश्रांत मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, हा क्षण संपूर्ण शाळेसाठी आणि पालकांसाठी अभिमानाचा ठरला आहे. वरदचे यश हे त्याच्या मेहनतीचे, शिस्तीचे व खेळावरील प्रेमाचे फलित आहे. या स्पर्धेसाठी त्याला न्यू हायस्कूलचे क्रीडा शिक्षक वानखेडे सर, स्विमिंग कोच संजय भगत, गणेश मुंडे, वैजनाथ वेरुळे, रमेश चाटे आदींचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी क्रीडा विभागाचे हौसळकर सर, एस एफ आय चे सचिन मंजुळे, शैलेश चव्हाण आदींनी वरदला पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. चि. वरद श्रीराम लांडगे यांने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव माननीय आमदार सतीशभाऊ चव्हाण तसेच शालेय समिती परळी वैजनाथचे अध्यक्ष नानासाहेब (काका) सोळंके यांनीदेखील कौतुक व्यक्त केले असून त्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. न्यू हायस्कूल शाळेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री. मोरे, के. व्ही., पर्यवेक्षिका सौ. छाया देशमुख, क्रीडा शिक्षक श्री. नारायण वानखेडे, ज्येष्ठ शिक्षक श्री. शहापूरे सर अमर देशमुख सर व शिंदे डी. एम. सर आदीनी त्याचा सत्कार केला. मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, सहाध्यायी व क्रीडा प्रेमी यांनी वरदचा सत्कार करत त्यास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.वरदच्या या कामगिरीमुळे शाळा, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांमध्ये समाधान व अभिमान व्यक्त होत असून विभागीय स्तरावरील त्याच्या सहभागाबाबत सर्वांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ***

## दरवळणारा सुगंध...

**आपल्या नशिबाला दोष देण्याऐवजी आपण परिश्रमाची ताकद वाढवली व सकारात्मक विचार केला तर नशिबाला देखील आपल्यासमोर नतमस्तक व्हावेच लागेल..!**

# छोट्या व मध्यम वृत्तपत्रांकडे शासनाचे दूर्लक्ष..

आजचा दिवस महाराष्ट्र आणि देशासाठी विशेष महत्त्वाचा आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, भारताचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचा वाढदिवस आणि महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त सुरू होणारा सेवा पंधरवडा या तिहेरी औचित्याने समाजजीवनात उत्साहाचे वातावरण आहे. अशा दिवशी शासनाकडून विशेष उपक्रम, माहितीपर कार्यक्रम आणि जाहिरातींची अपेक्षा असणे साहजिक आहे. परंतु या पार्श्वभूमीवर छोट्या व मध्यम वृत्तपत्रांचा अपेक्षाभंग झाल्याचे चित्र स्पष्ट दिसते आहे.

महाराष्ट्र शासनाच्या योजना आणि उपक्रमांचा खरा दुवा साधणारी ही छोटी वृत्तपत्रे आहेत. ग्रामीण भागात त्यांचे प्रभावी जाळे असून, शासनाची माहिती ही वृत्तपत्रे जसेच्या तशी वाचकांपर्यंत पोहोचवतात. कोणत्याही काटछाटीशिवाय, कोणत्याही राजकीय दबावाशिवाय बातम्या जनतेसमोर ठेवण्याचे काम ही वृत्तपत्रे प्रामाणिकपणे करत असतात. शासनाच्या योजना, लेख आणि बातम्यांचे रकानेच्या रकाने भरून जाणारे पान ही याची साक्ष आहे. ग्रामीण वाचक या वृत्तपत्रांवर शंभर टक्के विश्वास ठेवतात आणि शासनाचे धोरण थेट त्यांच्या मनावर परिणाम करावे, यामध्ये या वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची ठरते.

पण जाहिरातींच्या बाबतीत मात्र शासनाचा दृष्टिकोन दुर्दैवाने वेगळा असतो. मोठ्या दैनिकांना विशेष जाहिरातींचा सढळ हात असतो, तर लहान व मध्यम वृत्तपत्रांचा विचारच केला जात नाही. आर्थिक बाजू कमकुवत असूनही ही वृत्तपत्रे शासनाच्या बातम्या छापण्यास मागेपुढे पाहत नाहीत. परंतु त्यांच्या स्थैर्यासाठी शासनाच्या जाहिराती हीच महत्त्वाची कडी आहे. त्या मिळाल्या नाहीत तर ही पत्रे संघर्ष करत राहतात.

अशा विशेष प्रसंगी छोट्या वृत्तपत्रांना जाहिरात मिळाली असती, तर शासनाचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचला असता. ग्रामीण भागातील लोकांपर्यंत शासनाची माहिती आणि योजना थेट पोहोचण्यासाठी हीच पत्रे सर्वाधिक प्रभावी आहेत. मात्र शासनाने पुन्हा एकदा त्यांना वंचित ठेवले आहे, हे दुर्दैवीच म्हणावे लागेल.

छोट्या वृत्तपत्रांचा शासनाशी असलेला विश्वास, त्यांची प्रामाणिकता आणि ग्रामीण भागाशी असलेली नाळ याचा सन्मान करण्याची वेळ आली आहे. जाहिरातींचे वाटप करताना फक्त मोठ्या दैनिकांकडे पाहणे हा अन्याय आहे. शासनाने या वृत्तपत्रांचा सन्मान केला पाहिजे, कारण शासनाचा संदेश खऱ्या अर्थाने जनतेच्या मनापर्यंत पोहोचवण्याचे काम हीच वृत्तपत्रे करतात. तुर्त इतकेच....!

**– प्रदीप दे. कुलकर्णी,**
माजलगाव

## अस्मानी!

*शेतकऱ्यांनी केलेल्या कष्टावर*
*थयाथया नाचून गेलास*
*हातातोंडाशी आलेला घास*
*निर्दयीपणे हिसकावून नेलास.*

*गोठ्यात बांधलेली गुरंढोरं*
*आकांताने ओरडत व्हती*
*वासरं वाहून जाताना*
*दाव्याला हिस्के देत व्हती.*

*तू नेहमीच अवेळी*
*आरडत ओरडत येतोस*
*आम्ही पाहिलेलं सपान*
*अर्ध्यावर गाबडून जातोस.*

*ध्यानात ठेव अवकाळी*
*हार आम्ही मानत नाहीत*
*तुझ्या निर्दयी वागण्याला*
*भीक आम्ही घालत नाहीत.*

*एकमेकांना मदत करून*
*पुन्हा नव्याने पेटून उठू*
*तुझ्या अस्मानी संकटाशी*
*नव्या उमेदीने पुन्हा खेटू!*

**– प्रा.पंजाबराव येडे**
परळी वैजनाथ.